# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
### संचालनालय, लेखा व कोषागारे,
### कस्तुरी इमारत, तळमजला, ज. टाटा मार्ग,
### पेट्रोलियम हाऊसच्या समोर, चर्चगेट, मुंबई- ४०००२०

**दुरध्वनी क्रमांक : ०२२-२२८८०१०६ / ११७** E-Mail: aao.hrms@mahakosh.in


संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २१ डिसेंबर २०१९ चे परिशिष्ट - क.

२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२०३/कोषा (प्रशा-३ ),दि. ०९ .०९. २०२०.

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २८.१०. २०२१.

४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दिनांक १४ .१०. २०२२.

५. वित्त विभाग पत्र क्रमांक संकिर्ण -२०१९/प्र.क्र.२०३/कोषा (प्रशा-३ ) दिनांक ०५ .१२. २०२२.

६. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २०१९/प्र.क्र.५८१ ए/१६-ब दि.१४.१२.२०२२

७. वित्त विभाग पत्र क्रमांक संकिर्ण -२०१९/प्र.क्र.२०३/कोषा (प्रशा-३ ) दिनांक ०५ जानेवारी २०२४.

८. संचालनालयाचे आदेश क्र.संलेको/प्रशा- राप-सलेअ/०१-२०२४/कले/न.क्र.१३५(३)/अधिसंख्य पद/ ६६/४१/ ३७५ दि.१८.०१.२०२४

९. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णयक्र.बीसीसी-११२४/प्र.क्र.४५/आरक्षण -२(१६-ब) दि.०७.०५.२०२४

क्र.संलेको/प्रशा-राप-सलेअ/०५-२०२४/कले/न.क्र.१३५( ३)/ अधिसंख्य पद/374/266 दि. 08 MAY 2024

**प्रस्तावना :-**

संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई व अधिनस्त कार्यालयातील "गट ब" संवर्गातील कार्यरत सहाय्यक लेखा अधिकारी यांनी अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्यामुळे/ अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे त्यांचे करीता संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदे निर्माण करुन ११ महिने किंवा सदर अधिकारी सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत संदर्भ क्र. ८ अन्वये मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत कार्यरत सहाय्यक लेखा अधिकाऱ्यांची अधिसंख्य पदाची मुदत दि. ०९.०५.२०२४ रोजी संपुष्टात आली आहे.

अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे/अवैध ठरल्यामुळे अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना सेवा विषयक /सेवा निवृत्ती विषयक लाभ मंजूर करणेबाबत नव्याने कार्यप्रणाली/धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार अधिसंख्य पदावर कार्यरत शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना मानवतावादी दृष्टीकोनातून व त्यांनी केलेल्या सेवेचा विचार करुन १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुन्हा ११ महिन्यांच्या कालावधीकरीता त्यांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरु ठेवण्याचे निर्देश संदर्भ क्र.६ अन्वये देण्यात आले आहेत. त्याअनुषंगे संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई व अधिनस्त कार्यालयातील "गट ब" संवर्गातील अधिसंख्य पदावर कार्यरत सहाय्यक लेखा अधिकाऱ्यांना अधिसंख्य पदावर मुदतवाढ देण्याबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## -: आदेश :-

संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई व अधिनस्त कार्यालयातील "गट ब" संवर्गातील सद्यस्थितीत अधिसंख्य पदावर कार्यरत सहाय्यक लेखा अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांना पुढील ११ महिने किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनाकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत संदर्भ क्र.६ नुसार १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मुदतवाढ देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव , पदनाम व कार्यरत कार्यालयाचे नाव | अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आल्याचे संचालनालयाचे आदेश क्रमांक व दिनांक | संदर्भ क्र.८ अन्वये ११ महिने मुदतवाढ मंजूर केल्याचा दिनांक. | एक दिवसाचा तांत्रिक खंड | अधिसंख्य पदावर नियुक्तीस पुढील ११ महिन्यांसाठी खालील दिनांकापासून मुदतवाढ मंजूर |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. गजानन भास्कर नंदनकर, सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी, सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नागपूर. **(से.नि.दि.३०.०९.२०२९)** | क्र.संलेको/प्रशा-राप-सलेअ/१०-२०२०/ सअ/ न.क्र.१३५(२)गभानंदनकर/ अधिसंख्य पद /४४९/२६५१ दि.१६.१०.२०२०. | १०-०६-२०२३ ते ०९-०५-२०२४ | **१०-०५-२०२४** | **११-०५-२०२४ ते १०-०४-२०२५** |
| २ | श्री. भगवंत रामकृष्ण पखाले, सहाय्यक लेखा अधिकारी जिल्हाधिकारी (अंतर्गत लेखा परीक्षण) कार्यालय, अकोला. **(से.नि.दि.३०.११.२०२५)** | क्र.संलेको/प्रशा-राप-सलेअ/१०-२०२० /सअ/ न.क्र.१३५(२)भरापखाले/ अधिसंख्य पद /४५०/२६५२ दि.१६.१०.२०२०. | १०-०६-२०२३ ते ०९-०५-२०२४ | **१०-०५-२०२४** | **११-०५-२०२४ ते १०-०४-२०२५** |
| ३ | श्री.जय रा.धोपे, सहाय्यक लेखा अधिकारी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापुर, जि. ठाणे. **(से.नि.दि.३१.०८.२०२६)** | क्र.संलेको/प्रशा-राप-सलेअ/१०-२०२० /सअ/ न.क्र.१३५(२)जराधोपे/ अधिसंख्य पद /४५३/२६५५ दि.१६.१०.२०२०. | १०-०६-२०२३ ते ०९-०५-२०२४ | **१०-०५-२०२४** | **११-०५-२०२४ ते १०-०४-२०२५** |
| ४ | श्री.अभय मधुकरराव चांदेकर, सहाय्यक लेखा अधिकारी, प्रबंधक, ग्राहक तक्रार निवारण मंच, गडचिरोली. **(से.नि.दि.३१.०३.२०३१)** | क्र.संलेको/प्रशा-राप-सलेअ/१०-२०२० /सअ/ न.क्र.१३५(२)/ अधिसंख्य पद ४६६/दि.१६.१०.२०२०. | १०-०६-२०२३ ते ०९-०५-२०२४ | **१०-०५-२०२४** | **११-०५-२०२४ ते १०-०४-२०२५** |
| ५ | श्रीम. शकुंतला निलकंठराव अडबोल, सहाय्यक लेखा अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,अकोला. **(से.नि.दि.३०.११.२०२४)** | क्र.संलेको/प्रशा-राप-सलेअ/१०-२०२० /सअ/ न.क्र.१३५(२)श्रीम.अडबोल/ अधिसंख्य पद /४५५/२६५७ दि.१६.१०.२०२०. | १०-०६-२०२३ ते ०९-०५-२०२४ | **१०-०५-२०२४** | **११-०५-२०२४ ते ३०-११-२०२४** |
| ६ | श्रीम.वंदना प्रशांत मायटे, सहाय्यक लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, बांद्रा, मुंबई. **(से.नि.दि.३१.०५.२०३३ )** | क्र.संलेको/प्रशा-राप-सलेअ/१०-२०२० /सअ/ न.क्र.१३५(२)श्रीम.मायटे/ अधिसंख्य पद /४५७/२६५९ दि.१६.१०.२०२०. | १०-०६-२०२३ ते ०९-०५-२०२४ | **१०-०५-२०२४** | **११-०५-२०२४ ते १०-०४-२०२५** |

१. **अधिसंख्य पदावरील ११ महिन्यांचा कालावधीची नोंद उपरोक्त अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी. सदर अधिकाऱ्यांची बदली इतरत्र झाल्यानंतर त्यांच्या अंतिम वेतन प्रमाणपत्रात अधिसंख्य पदाची नोंद घेण्यात यावी.**

२. वरील सहाय्यक लेखा अधिकारी यांची सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यापूर्वी त्यांना जेवढे मासिक वेतन व भत्ते मिळत होते, तेवढे वेतन भत्ते त्यांना पुढील आदेश होईपर्यंत देण्यात येईल.

**३. अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या सेवेसंबंधी संदर्भ क्र.९ नुसार मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार उपरोक्त अधिकाऱ्यांच्या बाबतीत पुढील कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत संचालनालयास अवगत करण्यात यावे.**

४. अधिसंख्य पदाच्या वेतनावर येणारा खर्च हा संबंधित अधिकारी ज्या कार्यालयात कार्यरत आहे, त्या कार्यालयाच्या वेतनासंबधीच्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा आणि संबंधित वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदरचे आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त अधिका-यांच्या अधिसंख्य पदावरील मुदतवाढ संबंधित कार्यालयप्रमुख यांनी संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरावी.

आदेशानुसार,

8/5/24

**(दीपा देशपांडे)**
**संचालक, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रत माहिती तथा पुढील उचित कार्यवाहिस्तव.**

१. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, रायगड भवन, नवी मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे (पु), मुंबई.
३. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/अमरावती/नागपूर.
४. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नागपूर विभाग, नागपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय (अंतर्गत लेखा परीक्षण), अकोला .
६. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापुर, जि .ठाणे .
७. प्रबंधक, ग्राहक तक्रार निवारण मंच, गडचिरोली .
८. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, अकोला.
९. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,अकोला/नागपूर/ठाणे/गडचिरोली.
१०. संबंधित अधिकारी.